दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १२४ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.६ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# महायुती सरकारचा मोठा निर्णय: प्रतिज्ञा पत्रासाठी ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची घोषणा; विद्यार्थ्यांना दिलासा

**मुंबई (वृत्तसंस्था)–महाराष्ट्राचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच महायुती सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आता प्रतिज्ञापत्रासाठी लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे. या निर्णयामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कारण प्रतिज्ञापत्रासाठी लागणारे मुद्रांक शुल्क माफ केल्याने विद्यार्थ्यांचा आर्थिक ताण आता हलका होणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयाची घोषणा केली.लाडकी बहीण योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असल्याने महसूल वाढीसाठी मुद्रांक शुल्काच्या दरात १०० रुपयांवरुन ५०० रुपये वाढ केलेली आहेत. याचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना बसत होता. विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक कारणास्तव अनेकदा प्रतिज्ञापत्रे सादर करावे लागतात. पण प्रतिज्ञापत्र ज्या मुद्रांकावर प्रिंट केले जातात, सरकारने त्या मुद्रांकाचे दर वाढवले. हे दर १०० रुपयांवरून थेट ५०० रुपये करण्यात आले होते. यामध्ये टायपिंगसाठी किमान ५०० रुपये आणि नोटरीसाठी १०० ते १५० रुपये लागत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना या प्रतिज्ञापत्रासाठी ७०० ते १००० रुपयांपर्यंत खर्च येत होता. मात्र, आता विद्यार्थ्यांसाठी मुद्रांक शुल्क माफ केल्याने ५०० रुपये वाचणार आहेत.**

राज्यात अनेक शासकीय कामासाठी तसेच सरकारी परीक्षेचा अर्जासाठी नागरिकांना जात पडताळणी, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र अशी प्रतिज्ञापत्रके जोडावी लागतात. या प्रतिज्ञापत्रकांसोबत एक ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्कही भरावे लागते. विशेषत: दहावी बारावीच्या निकालानंतर अनेक विद्यार्थी आणि पालकांचा ही सर्व प्रमाणपत्र लागतात. आता या प्रतिज्ञापत्रकांसोबत भरावे लागणारे ५०० रुपयांची स्टॅम्प ड्यूटी आता माफ करण्यात आली आहे.
जात पडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रीमी लेयर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रासह इतर सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी हा निर्णय लागू करण्यात आला आहे. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देशही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. या सर्व प्रमाणपत्रांना जोडावे लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क आता जोडावे लागणार नाही. यापुढे एका साध्या कागदावर स्वसाक्षांकित (सेल्फ अटेस्टेट ) अर्ज लिहून प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून मिळू शकेल. त्यामुळे प्रमाणपत्रासाठी नागरिकांना आर्थिक भूर्दंड सहन करावा लागणार नाही. त्यांना मुद्रांक शुल्काशिवाय प्रमाणपत्र देण्यात येईल.



### प्रमाणपत्रासाठी खर्च वाढल्याने पालकांमध्ये नाराजी

**पूर्वी केवळ १०० रुपयांच्या मुद्रांकासाठी साधारणत: २५० रुपये खर्च येत असे, परंतु मुद्रांक शुल्कात वाढ केल्याने हा खर्च अचानक १००० रुपयांपर्यंत वाढला होता. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत होती. शैक्षणिक प्रक्रियेसाठी हा अतिरिक्त खर्च परवडणारा नसल्यामुळे सरकारने त्वरित काहीतरी उपाययोजना करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत होती. या पार्श्वभूमीवर सरकारने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा देण्याचा निर्णय घेतला असून,आता विद्यार्थ्यांना मुद्रांक शुल्कातून सूट देण्यात आली आहे.**

# भारताने उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाचा कठीण पेपर सोडविला

## चेज मास्टर विराट कोहलीने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यात वर्ल्ड रेकॉर्डसह केली एका ऐतिहासिक कामगिरी

**दुबई | प्रतिनिधी**

विराटने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सेमी फायनलमध्ये अविस्मरणीय कामगिरी केली. कारण विराट कोहलीने यावेळी एक अनोखा वर्ल्ड रेकॉर्ड तर आपल्या नावावर केलाच, पण त्याचबरोबर इतिहासही रचला.
आतापर्यंत क्रिकेट विश्वात अशी कामगिरी एकाही खेळाडूला करता आलेली नाही.
विराट कोहली ऑस्ट्रेलियाच्या सामन्यातही भारताच्या मदतीला धावून आला. यापूर्वी विराट कोहलीने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात शतक झळकावले होते आणि संघाच्या विजायवर शिक्कामोर्तब केले होते. वनडे क्रिकेटमधल्या किंग असलेल्या विराट कोहलीने



ऑस्ट्रेलियालाही पाणी पाजले. शुभमन गिल बाद झाल्यावर विराट कोहली फलंदाजीला आला. त्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची चांगली जोडी जमेल, असे चाहत्यांना वाटत होते. पण रोहित शर्मा २८ धावांवर बाद झाला आणि त्यानंतर विराट कोहलीच्या खांद्यावर संघाच्या विजयाची जबाबदारी आली.विराट कोहलीने त्याचबरोबर धावांचा पाठलाग करताना आठ हजार धावांचा महत्वपूर्ण टप्पाही आता पूर्ण केला आहे. त्यामुळे विराट कोहलीच्या नावावर आता ऐतिहासिक कामगिरीची नोंद झाली आहे. चेज मास्टर या नावाने विराट कोहली क्रिकेट विश्वात ओळखला जातो, ही त्याची ओळख पुन्हा एकदा ऑस्ट्रेलियाच्या सामन्यात अधोरेखित झाल्याचे पाहायला मिळाले

### सीसीआयची बंद कापूस खरेदी केंद्र त्वरित सुरू करा!

# आमदार देवराव भोंगळे यांची मंत्री जयकुमार रावल यांचेकडे मागणी

**राजुरा | प्रतिनिधी**

चंद्रपुर जिल्ह्यासह संपुर्ण महाराष्ट्रात कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (उउख) चे कापुस खरेदी केंद्रे मुदतीआधीच अचानक बंद करण्यात आली असल्याने शेतकऱ्यांना आपला कापुस खासगी व्यापाऱ्यांकडे कमी दराने विक्री करावा लागत आहे. त्यामुळे सीसीआयकडून बंद करण्यात आलेली कापुस खरेदी केंद्रे तातडीने सुरू करण्याचे निर्देश संबंधितांना द्यावे, अशी मागणी राजुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवराव भोंगळे यांनी राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमारजी रावल यांचेकडे निवेदन देऊन केली आहे. विदर्भ हा महाराष्ट्रातील ३० टक्के कापूस उत्पादन करणारा प्रमुख प्रदेश असून विशेषतः



राजुरा विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात कापुस उत्पादन होते. परंतू सीसीआयने आपली कापुस खरेदी केंद्रे बंद केली असल्याने ७ हजार ४२० रूपये प्रती क्विंटल सरकारी हमीभावापेक्षा ६ हजार ८०० इतक्या कमी दराने शेतकऱ्यांना आपला कापुस खाजगी व्यापाऱ्यांना विकावा लागत आहे. त्यामुळे कापुस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला असून योग्य पर्यायाअभावी अजुनही हजारो शेतकऱ्यांच्या घरात विक्रीविना कापूस पडून आहे. त्यासाठी शासनाने या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष घालून सीसीआयने बंद केलेली कापुस खरेदी केंद्रे पुर्ववत सुरू करावी अशी मागणी आमदार देवराव भोंगळे यांनी राज्याचे पणन मंत्री ना. जयकुमारजी रावल यांना निवेदन देत केली आहे.

### कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंना दिलासा

# नाशिक कोर्टाची २ वर्षांच्या शिक्षेला स्थगिती आमदारकीवरील टांगती तलवार तूर्त दूर

**नाशिक(वृत्तसंस्था)**–नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना ठोठावण्यात आलेल्या २ वर्षांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. यामुळे कोकाटे यांच्या आमदारकी व पर्यायाने मंत्रिपदावरील टांगती तलवार तूर्त दूर झाली आहे.
राज्याचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना नाशिक स्थित न्यायालयाने १९९५ च्या एका प्रकरणात २ वर्षांची कैद व ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली होती. यामुळे लोकप्रतिनिधित्व कायद्यातील तरतुदींनुसार ते विधानसभेच्या सदस्यत्वासाठी अपात्र ठरण्याची भीती होती. त्यामुळे त्यांनी या शिक्षेला वरच्या कोर्टात आव्हान दिले होते. त्यांच्या याचिकेवर सुनावणी करताना कोर्टाने गत आठवड्यात आपला निर्णय राखून ठेवला होता. हा निर्णय कोर्टाने आज दिला. त्यात कोर्टाने अपिलावरील सुनावणी सुरू असेपर्यंत कोकाटेंच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. यामुळे कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला आहे.यासंबंधीच्या माहितीनुसार, माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांनी १९९५-९७ दरम्यान शासनाकडून मिळणाऱ्या सदनिका घेतल्या होत्या. यासाठी त्यांनी आमचे उत्पन्न कमी असून, आम्हाला दुसरे कोणते घरही नाही अशी बतावणी केली होती. त्यानंतर त्यांना या सदनिका मिळाल्या. विशेष म्हणजे कोकाटे बंधूंनी केवळ त्यांना मिळालेल्या सदनिकाच घेतल्या नाही, तर इतर दोघांना मिळालेली घरेही गरीब म्हणून लाटली.ही बाब अप्पर



जिल्हाधिकारी विश्वनाथ भास्कर पाटील यांच्या लक्षात आली. त्यांनी यासंबंधी तक्रार दाखल केली. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनीही यासंबंधी एका याचिकेद्वारे कोकाटे यांच्यावर कागदपत्रांत फेरफार व फसवणुकीचा आरोप केला होता.या प्रकरणी नाशिकच्या सरकार वाडा पोलिस ठाण्यात भादंवि कलम ४२०, ४६५, ४७१,४७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयात हे प्रकरण १९९७ पासून सुरू होते. त्याचा आज निर्णय आला. प्रस्तुत प्रकरणात एकूण ४ आरोपी होते. त्यात माणिकराव कोकाटे व त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांच्यासह इतर दोघांचा समावेश होता. पण कोर्टाने इतर दोन आरोपींना कोणत्याही स्वरुपाची शिक्षा ठोठावली नाही.पण कोकाटे बंधूंना २ वर्षांची शिक्षा व ५० हजार रुपयांच्या आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात एकूण ६ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली. जवळपास २९ वर्षांनी या खटल्याचा निकाल लागला आहे.

# हसन मुश्रीफ यांनी सोडले वाशिमचे पालकत्व

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सोडण्याची घोषणा केली आहे. यासाठी त्यांनी आपल्या मतदारसंघासाठी पुरेसा वेळ देता येत नसल्याचा दाखला दिला आहे. पण मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा तथा रायगड व नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटला नसल्याच्या पार्श्वभूमीवर मुश्रीफ यांनी हे पद सोडल्यामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारमध्ये नाशिक व रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदावरून भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या नेत्यांत वाद सुरू आहे. नाशिकचे पालकमंत्रिपद भाजपला, तर रायगडचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाले होते. पण या दोन्ही जागांवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने दावा सांगितला आहे. यामुळे या दोन्ही ठिकाणच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती दिली आहे. गत एक ते दीड महिन्यांपासून यावर कोणतेही राजकीय औषध सापडले नाही. त्यातच संतोष देशमुख हत्येप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांना आपल्या अन्न व नागरी पुरवठा मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.या पार्श्वभूमीवर राज्याचे वैद्यकीय शिक्षण हसन मुश्रीफ यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सोडण्याची घोषणा



केली आहे. हसन मुश्रीफ हे कोल्हापूरचे आहेत. कोल्हापूर पासूनचे वाशिमचे अंतर खूप जास्त आहे. यामुळे त्यांना आपल्या मतदारसंघासाठी पुरेसा वेळ देता येत नाही. परिणामी त्यांनी वाशिमचे पालकमंत्रिपद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाचा संबंध नाशिक व रायगडच्या वादाशी जोडला जात आहे. याविषयी राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क व्यक्त केले जात आहेत.

# मातोश्री महिला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिना निमित्त विज्ञान विभागाद्वारे विविध उपक्रमांचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विज्ञान म्हणजे तर्कशुद्ध विचारसरणीच्या आधारे विश्वाविषयीचे ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया. विज्ञानाच्या सहाय्याने मानवाने नवनवीन शोध लावले आणि तंत्रज्ञानात क्रांती घडवली. विज्ञानाचे महत्त्व नव्या पिढीला समजावे, तसेच त्यांच्या मनात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रमण यांच्या रमण इफेक्ट या महत्त्वपूर्ण शोधाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

या अनुषंगाने मातोश्री आशाताई कुणावर कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, हिंगणघाट येथे विज्ञान विभागाद्वारे २७ व २८ फेब्रुवारी २०२५ रोजी विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपूर येथील उपप्राचार्या डॉ. नयना शिरभाते यांच्या हस्ते करण्यात आली. या उपक्रमात विद्या विकास शाळा व ब्रिलियंट सीबीएसई स्कूल च्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील प्रयोगशाळांना भेट देऊन विविध प्रयोग पाहिले. विविध विषयांतील नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ यांची माहिती सांगणारे पोस्टर्स व विज्ञान प्रतिकृतींची प्रदर्शनी यावेळी सादर करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दुर्गाप्रसाद यादव (मास्टर ट्रेनर, आय.आय.टी. मुंबई) यांनी अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या विज्ञानातील शोध व विज्ञानाचे मानवी जीवनातील महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य नितेश रोडे (विद्याविकास कनिष्ठ महाविद्यालय), तसेच विज्ञान विभाग प्रमुख प्रा. शितल धार्मिक, कला विभाग प्रमुख प्रा. भाग्यश्री साबळे आणि वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. वैशाली तडस उपस्थित होते. विद्यार्थिनींसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विजेत्या विद्यार्थिनींना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तेजस्विता सहस्त्रबुद्धे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. समीक्षा पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र, गणितशास्त्र व संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. कार्यक्रमात बी.एस.सी. आणि एम.एस.सी. च्या विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग होता. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिंगत करण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरला.






# किरण ठाकरे यांची क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या विदर्भ विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती

**देवळी । प्रतिनिधी**

काल पुणे येथे पार पडलेल्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये शेतकरी नेते श्री रविकांतभाऊ तुपकर यांनी युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष श्री किरण ठाकरे यांची क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या विदर्भ विभागीय अध्यक्षपदी नियुक्तीची घोषणा केली. किरण ठाकरे यांनी अनेक आंदोलने करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम सातत्याने केले आहे. वर्धा जिल्ह्यामध्ये युवा संघर्ष मोर्चा या नावाने संघटना स्थापन करून तरुण शेतकऱ्यांचे सहकार्याने अनेक अभूतपूर्व आंदोलने व मोर्चे काढून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे काम ते सातत्याने करीत आहेत. किरण ठाकरे यांच्या नियुक्तीमुळे त्यांच्या सहकाऱ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला असून त्यांनी शेतकरी नेते रविकांतभाऊ तुपकर यांचे आभार व्यक्त केले आहे.नियुक्तीची घोषणा होताच युवा संघर्ष मोर्चाचे कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला.

युवा संघर्ष मोर्चाचे प्रविण कात्रे, गौतम पोपटकर, ऍड.मंगेश घुंगरूड, समीर सारजे, मनोज नागपुरे, संदीप दिघीकर, लोमहर्ष बाळबुधे, राहुल पेटकर, स्वप्नील मदनकर, दिनेश गुळघाणे, तुषार झोड, वैभव नगराळे, गौरव खोपाळ, नुपेश काळे, अविनाश धुर्वे, मंगेश वानखेडे, हनुमंत पचारे, प्रणित हुसनापुरे, इरफान शेख, रुपेश कडू, अक्षय कोठेकर, विशाल पेंदाम, अमोल भोयर, प्रविण तराळे इत्यादींनी किरण ठाकरे यांचे अभिनंदन केले.




# शिवार फेरी द्वारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याचा प्रयत्न

**देवळी । प्रतिनिधी**

शिवार फेरी मुळे वाढते शेतकर्यांचे मनोबल पिकातील असलेला फरक शेतकरयांना डोळ्यांनी पाहता येते त्यामुळे स्वतः शेतकरी आपल्या शेतात जास्त पीक झाले पाहिजे म्हणून शेतात प्रयोग करतो, बोपापुर दिघी हे गाव सेलसूरा कृषी विज्ञान केंद्र यांचे दत्तक गाव आहे या गावात वेगवेगळे शेतकरयांना प्रयोग करण्यासाठी पी के वी व कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने धनुका अग्रीटेक प्रा. ली. यांचा हरभरा पीक उत्पादन सुधार होण्याच्या दुस्तिकोनातून ५ शेतकऱ्यांचा शेतावर प्रात्यक्षिक घेण्यात आले,त्यांना लावणी पासुन तर काढणी पर्यन्त धानुका प्रा ली मार्गदर्शन केले तसेच त्यांचे बीज प्रक्रिया ते किडी, रोग, पर्यन्त शेतकरयांना बुरशीनाशक, अंडी नाशक आणि अळी वर सुध्दा चागले काम करणारे कीटक नाशक, मयकोरसुपर सारखे खत त्यांनी शेतकरयांना प्रात्यक्षिक प्लॉट वर डेमो म्हणून फावरणी, आणि शेतात टाकण्यासाठी दिले त्यामुळे शेतकऱ्यांनी स्वतः लागवड केलेली पिक आणि पी के वी व के. वी. के. सेलासुरा, अंतर्गत धणुका प्रा ली त्यांच्या मार्गदर्शनात लागवड केलेली पिक मध्ये काय फरक आला यासाठी ही शिवार फेरी आयोजित केली.त्या करिता मार्गदर्शक म्हणून ड्रॉ. जीवन काटोरे डॉ. नीलेश वजिरे धाणुका चे घनश्याम इंगळे कार्यक्रमाचे उद्घाटक सरपंच विनोद दांदडे प्रमुख अतिथी सचिन वदतकर पो पा लिलाधर डबले सुशील उमरे,प्रविन वाटकर तसेच सूरज देशमुख अमोल हेपट धीरज कदम राहुल चाफले नीलेश पेठे यश काळपांडे यांची उपस्थिती होती. यावेळी शेतकऱ्यांना हरभरा पीक उत्पादन सुधारणा बाबत मार्गदर्शन करताना शेतात दोन पिकातील काय फरक आला याविषय चर्चा करण्यात आली.त्या वेळीं दोन्ही पिकातील फरक शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पणे अनुभवला तर उत्पादनात नक्कीच फरक दिसला असे शेतकऱ्यांनी सांगितले तसेच वेगवेगळे तंत्रज्ञान बाबत माहिती देण्यात आली या कार्यक्रमात प्रवीण वाटकर यांचा सत्कार करण्यात आला. यशस्वी करिता अमोल हेपट आणि पेठे यांनी परिश्रम घेतले.



# श्री महाकाली प्रगट दिन उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**पुलगाव । प्रतिनिधी**

नजिकच्या आपटी फाटा येथे असलेल्या श्री महाकाली देवस्थानामध्ये प्रगट दिन उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री भगवती महाकाली देवस्थान आपटी फाटा येथे महाकाली प्रगट दिन उत्सव शनिवार ८ मार्च २०२५ रोजी साजरा करण्यात येत आहे. बुधवार दि. ५/३/२०२५ सायं. ६ वाजता दिपयज्ञ कार्यक्रम,दुपारी ३ ते ६ महाकाली महिला भजन मंडळ आपटी यांचा भजनाचा कार्यक्रम,रात्री ७ ते १० श्री गुरुदेव भजन मंडळ आपटी यांचा भजनाचा कार्यक्रम होईल. गुरुवार दि. ६ मार्च २०२५ दुपारी १२ वाजता महिला भजन मंडळ वाघोली यांचे भजन,रात्री ९ वाजता श्री गुरुदेव भजन मंडळ वाघोली यांचे भजन होईल. शुक्रवार दि. ७ मार्च २०२५ सकाळी ९ वाजता महिलाकरीता कुंकुमार्चन अभिषेक कार्यक्रम श्री मोहन देव शास्त्री यांच्या उपस्थितीत पार पडेल. शनिवार दि. ८ मार्च २०२५ दुपारी १ वाजता श्री राधा सत्संग भजन मंडळ पुलगाव यांचे भजन, सकाळी ६ वाजता श्री माताजी स्नान,अभिषेक व वस्त्र परिधान दुपारी १ ते ५ महाप्रसाद कुंकुमार्चन कार्यक्रमाकरीता महिलांच्या वाढत्या मागणीमुळे प्रथम नांव नोंदणी करावी व सोबत पुजेकरीता कोणतीही देवीची मुर्ती, १ ताट, २ वाटया, १ तांब्याचा गडवा, १ पेला, अष्टदळ, १ आचपाळी, १ आसन सोबत आणावे. तसेच दुर्वा सोबत आणावा. पुजेचे साहीत्य देवस्थान तर्फे देण्यात येईल. कुंकुमार्चन करीता नांव नोंदवण्यास संपर्क श्री महाकाली देवस्थान आपटी फाटा पुलगाव येथे करावा.

# तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसीच्या पदविका विद्यार्थ्यांची औषधीय वनस्पतीच्या बागेला भेट

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचा महत्त्वाच्या शैक्षणिक उपक्रमांचा एक भाग म्हणून, हिंगणघाट येथील तुळसकर कॉलेज ऑफ फार्मसीने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी पर्यावरण संवर्धन संस्था, हिंगणघाट यांच्या देखरेखीखाली असलेल्या सागरबाग (औषधी वनस्पती बाग) येथे डी. फार्म-१ च्या विद्यार्थ्यांसाठी औषधी वनस्पती बाग भेटीचे आयोजन केले. प्राध्यापकांसह एकूण ५५ विद्यार्थ्यांनी बागेला भेट दिली. भेट दुपारी १.३५ वाजता सुरू झाली. भेटीदरम्यान सर्व विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना सागरबागेत असलेल्या सर्व औषधी वनस्पतींबद्दल बरीच माहिती मिळाली. सुप्रशिक्षित मार्गदर्शक सागरबाग येथील आशिष भोयर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गुंडे यांनी विद्यार्थ्यांना बागेत असलेल्या सर्व औषधी वनस्पतींच्या अनेक पैलूंबद्दल तपशीलवार माहिती दिली.

आपल्याकडे आढळणाऱ्या विविध वनस्पती म्हणजे: सिंदूर, अर्जुन, बेल, चिंच, बेहेडा, रुद्राक्ष, रक्तकांचन, बिल्वा, फिकस, शिशम, चंदन, आंब्याच्या विविध जाती इत्यादी. सर्व विद्यार्थ्यांना विविध औषधी वनस्पतींच्या आकारविज्ञानाविषयी तसेच आवश्यक औषधनिर्माणशास्त्रीय माहिती, रासायनिक घटक आणि औषधी वनस्पतींचे उपयोग याबद्दल व्यावहारिकदृष्ट्या चांगले ज्ञान मिळाले. याव्यतिरिक्त, त्यांना प्रत्यक्ष वातावरणातील व्यावहारिक अनुभव देताना, सैद्धांतिक ज्ञान आणि प्रत्यक्ष औषधी वनस्पतींमधील माहितीतील अंतर कमी होण्यास मदत झाली.प्राचार्य डॉ. महेंद्र गुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा प्रदीप एस. रघाटाटे (एचओडी-डिप्लोमा), प्रा प्रणय बुरले , प्रा अंजु तन्ना आणि प्रा पराग भाईमारे यांनी कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केलश्र . महाविद्यालयाने पर्यावरण संवर्धन संस्था प्रशासन आणि सागरबाग कर्मचाऱ्यांचे त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल आणि सहकार्याबद्दल मनापासून आभार मानले.




# घर बांधायचे आहे पण रेती आणायची कुठून; तालुक्यातील नागरिकांमध्ये ओरड

**देवळी । प्रतिनिधी**

तालुक्यातील रेती घाट लिलाव प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्यामुळे रेतीचे दर गगनाला भिडले आहेत. परिणामी घराचे बांधकाम करणाऱ्या नागरिकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. रेती उपलब्ध न झाल्याने अनेक बांधकामे रखडली असून, नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी आहे.

तालुक्यात मोठ्या संख्येने घरकुल योजना मंजूर झाल्या आहेत. मात्र, रेती लिलाव प्रक्रिया न झाल्यामुळे लाभार्थींचे स्वप्न अद्याप अपूर्ण आहे. अधिकृत रेती घाट बंद असल्याने अवैध रेती विक्रीला ऊत आला असून, अवाजवी दराने रेती खरेदी करणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे.तालुक्यातील रस्ते, सरकारी इमारती आणि खासगी घरांच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात रेतीची गरज आहे. परंतु रेती घाट बंद असल्याने शासनाला महसूल बुडतो आहे आणि मजुरांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे.शासनाने लवकरात लवकर रेती लिलाव प्रक्रिया पूर्ण करून नागरिकांना योग्य दरात रेती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांतून जोर धरू लागली आहे.

# शहाजी शिंदे व शीतल तोरडमल इनामगाव सोसायटीच्या नेतृत्वावर

**शिरूर । प्रतिनिधी**

इनामगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी शहाजी रामभाऊ शिंदे, तर व्हाईस चेअरमनपदी शीतल संजय तोरडमल यांची बिनविरोध निवड झाली. या निमित्त बाभुळसर बु.च्या सरपंच दिपाली महेंद्र नागवडे यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष श्रीनिवास तात्या घाडगे, ग्रामपंचायत सदस्य महेश घाडगे, सतीश नलगे, माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती महेंद्र नागवडे, बाभुळसर बु. वि. का. सोसायटीचे माजी चेअरमन भाऊसाहेब थोरात, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ नागवडे, संजय तोरडमल, सर्जेराव भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात सरपंच दिपाली नागवडे यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या, तर आभार महेश घाडगे यांनी मानले.



# मातोश्री महिला महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा




**हिंगणघाट । प्रतिनिधी**

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कविवर्य कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस ' जागतिक मराठी भाषा गौरव दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. मातोश्री आशाताई कुणावर कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय हिंगणघाट, येथे मराठी विभागांतर्गत मराठी गीतगायन व मराठी काव्य सादरीकरण अशा अभिनव उपक्रमांद्वारे हा दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. अजय बिरे, प्रमुख अतिथी ग्रंथपाल डॉ. सुनंदा गिरडे, कला विभाग प्रमुख प्रा. भाग्यश्री साबळे, कला, वाणिज्य व विज्ञान विभागातील प्राध्यापक वर्ग तसेच बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. याप्रसंगी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कला विभाग प्रमुख प्रा. भाग्यश्री साबळे यांनी प्रास्ताविकातून मराठी भाषा व मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा याविषयी माहिती दिली व कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या स्वरचित कविता व मराठी गीत गायन कार्यक्रमास विद्यार्थी प्राध्यापकांचा भरभरून प्रतिसाद दिला. कु.लक्ष्मी वाकडे, कु. सुहानी शेंडे या विद्यार्थिनींनी स्वरचित कवितांचे सादरीकरण केले. प्रा. प्रणिता आष्टणकर, प्रा. इंगळे, प्रा. डिंपल नवले, प्रा. पूनम बुरीले, प्रा. संगीता लांडगे, प्रा.मीनाक्षी जिडगिलवर, प्रा. भाग्यश्री साबळे, प्रा. गणेश इंगोले, प्रा.जमीर पटेल यांनी कविता वाचन केले. प्राध्यापकांनी आपल्या जीवनानुभवाला खेळकर विनोदी शैलित मांडल्याने कार्यक्रमाला खरी रंगत आली. प्रा. हर्षदा राऊत यांनी याप्रसंगी सुरेल मराठी गीताचे सादरीकरण केले. प्रमुख अतिथी डॉ. सुनंदा गिरडे यांनी स्वरचित कवितेचे वाचन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. अजय बिरे यांनी अध्यक्षीय मनोगतातून मराठी गौरव दिनाचे महत्त्व सांगितले. स्वतःच्या प्रत्यक्ष जीवनात मराठी भाषेचा आवर्जून वापर करण्याची आवश्यकता त्यांनी याप्रसंगी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डिंपल नवले तर आभार प्रा. पूनम बुरीले यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजनासाठी संपूर्ण प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी,विद्यार्थिनींनी सहकार्य केले.

# सी.सी.आय.ची कापूस खरेदी सोमवारपासून सुरू होणार

## युवा संघर्ष मोर्चाचे ठिय्या आंदोलनानंतर सी.सी.आय.चे आश्वासन

**देवळी । प्रतिनिधी**



गेल्या पाच सहा दिवसांपासून देवळी येथील सी.सी.आय. द्वारे केली जाणारी कापूस खरेदी अचानक बंद करण्यात आली होती त्यामुळे नाईलाजाने शेतकऱ्यांना आपला कापूस पाचशे ते सहाशे रुपये प्रति क्विंटल कमी दराने खासगी व्यापाऱ्यांना विकावा लागत होता. त्याचप्रमाणे नविन शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी सुद्धा बंद होती. कृषी उत्पन्न बाजार समिती देवळी येथून काही शेतकऱ्यांनी याबद्दल माहिती युवा संघर्ष मोर्चाचे अध्यक्ष श्री किरण ठाकरे यांना दिली. किरण ठाकरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कृषी उत्पन्न बाजार समिती गाठून सचिवांकडून संपूर्ण माहिती घेतली, सी.सी.आय.चे अधिकारी श्री चंद्रकांत हिवसे यांचेशी फोनवरून चर्चा केली, कुठलाही मार्ग निघत नसल्याने शेतकऱ्यांसह किरण ठाकरे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पायऱ्यावरच ठिय्या आंदोलन सुरू केले व जोपर्यंत सी.सी.आय.चे अधिकारी आंदोलनस्थळी येऊन शेतकऱ्यांचे समाधान करणार नाहीत तोपर्यंत या ठिकाणाहून उठणार नसल्याचे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सचिवांना कळविले.

शेवटी दोन तासानंतर सी.सी.आय.चे अधिकारी श्री चंद्रकांत हिवसे हे हिंगणघाट येथून देवळीला आले व किरण ठाकरे यांच्याशी चर्चा केली. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री मनोज वसू हे देखील उपस्थित होते. चर्चेअंती ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया आजपासूनच सुरू करणार असल्याचे सांगितले व यापूर्वी ऑनलाइन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा कापूस येत्या सोमवारपासून खरेदी करण्याचे आश्वासन उपस्थित सर्व शेतकऱ्यांना दिले. व आजपासून नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचा कापूस दि. १७/०३/२५ पासून सलग खरेदी करू असे आश्वासन दिले.

शेवटी शेतकऱ्यांचे समाधान झाल्यामुळे ठिय्या आंदोलन स्थगित केल्याचे किरण ठाकरे यांनी जाहीर केले.

ठिय्या आंदोलनात प्रविण कात्रे, गौतम पोपटकर, समीर सारजे, मनोज नागपुरे, संदीप दिघीकर, अविनाश धुर्वे, अक्षय कोठेकर, गौरव खोपाळ, प्रशांत बाडे, प्रणित हुसनापुरे, हनुमंत पचारे, मनिष पेटकर व इतर अनेक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला.

# मुल शहरातील काही भागात पावसाळ्यात पाणी तुबण्याची समस्या

## पावसाळ्यापूर्वी तात्काळ उपाययोजना करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**मूल । प्रतिनिधी**



शहरातील वॉर्ड क्रमांक १६, फॉरेस्ट ऑफिसच्या मागील परिसरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचते, त्यामुळे नागरिकांना दरवर्षी गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट) तर्फे करण्यात आली आहे.

यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मूल शहराध्यक्ष आकाश येसनकर यांनी प्रशासनाला निवेदन देऊन तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली आहे. त्यांच्या मते, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांना वारंवार या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे तात्पुरत्या नव्हे, तर कायमस्वरूपी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. या भागात नाले अरुंद आणि तुंबलेले असल्याने पावसाचे पाणी व्यवस्थित वाहून जात नाही. तसेच, रस्त्याची उंची कमी असल्याने तलावातील पाणी रस्त्यावर येते, परिणामी संपूर्ण परिसर जलमय होतो. काही महिन्यांपूर्वी येथे सिमेंटचा भोंगा बसवण्यात आला होता, मात्र तो अकार्यक्षम ठरल्याने समस्या जैसे थेच आहे. नागरिकांच्या आरोग्यासाठी व सुरक्षिततेसाठी ही परिस्थिती धोकादायक ठरू शकते. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे. प्रशासन या समस्येवर त्वरित निर्णय घेणार की नागरिकांना पुन्हा त्रास सहन करावा लागणार, याकडे संपूर्ण मूल शहराचे लक्ष लागले आहे.

# बाभुळसर बु. येथे ग्रीस्टॅक अंतर्गत फार्मर आयडी कॅम्प संपन्न

**शिरूर । प्रतिनिधी**



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने बाभुळसर बु. ग्रामपंचायत कार्यालयात शेतकऱ्यांचा सातबारा आधार लिंक करण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले. या कॅम्पमध्ये फार्मर आयडी काढण्याची सुविधा देण्यात आली.

सरपंच महेंद्र नागवडे यांच्या उपस्थितीत कृषी सहाय्यक महादेव गदादे व ग्रामपंचायत संगणक परिचालक अमित नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना फार्मर आयडी वाटप करण्यात आले.

या वेळी शेतकरी ज्ञानदेव शितोळे, पोलीस पाटील रणजीत पाडळे, अल्लाउद्दीन अलवी (सचिव – राज्य मराठी पत्रकार परिषद, शिरूर तालुका), ऋषी निंबाळकर (युवा नेते), सुभाष गवळी, सुरेश नागवडे, सोमनाथ नागवडे, नवनाथ नागवडे, आण्णा गवळी आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

बाभुळसर बु. व गणेगाव दुमाला येथील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. आधार कार्ड व आधार लिंक असलेला मोबाईल घेऊन आलेल्या शेतकऱ्यांचे सीएससी धारकांमार्फत फार्मर आयडी ओपन करण्यात आले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी सरपंच, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील यांचे आभार मानले.

# सरपंच संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ गुरुवारी गंगाखेड बंद



**गंगाखेड । प्रतिनिधी**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ अखंड मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी गंगाखेड शहर बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भात मंगळवारी तहसील व पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली. विशेष म्हणजे या हत्येचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात आले, ज्यामुळे संतापाची लाट उसळली आहे.

सध्या व्हायरल होत असलेल्या पोस्टमुळे जनतेमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येतील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी गुरुवारी गंगाखेड शहर बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

# संगमनेरमध्ये 'आमदार आपल्या गावात' अभियान राबविणार–आ.अमोल खताळ

**संगमनेर । प्रतिनिधी**

संगमनेर विधानसभा मतदारसंघातील गावपातळीवरील प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच 'आमदार आपल्या गावात' हे अभियान सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा आ. अमोल खताळ यांनी केली. तालुक्यातील डिग्रस येथे एकलव्य जयंती आणि प्राथमिक शाळेच्या खोलीच्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

आ. खताळ म्हणाले की, महायुतीचा आमदार नसतानाही मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संगमनेर तालुक्यासाठी ६०० कोटींचा निधी दिला. आता संगमनेर विधानसभेचा आमदार महायुतीचा असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्याने अधिकाधिक विकास निधी मिळवला जाईल. हजारो कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून तालुक्यातील मूलभूत सुविधांचा विकास केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. साकूर पठार, तळेगाव, निमोण या भागातील नागरिकांना दीर्घकाळ वंचित ठेवलेला पाणीप्रश्न सोडवून हा तालुका टँकरमुक्त करणे हे प्राधान्य राहील, असेही आ. खताळ यांनी सांगितले. आ. खताळ यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांना आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि साखर कारखाना



निवडणुकांसाठी एकत्र येण्याचे आवाहन केले. ज्या पद्धतीने विधानसभा निवडणुकीत मला आमदार म्हणून निवडून दिले, त्याचप्रमाणे पुढील निवडणुकांमध्येही महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी कामाला लागा असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक हरी कोरडकर होते. यावेळी भाजपा तालुका उपाध्यक्ष संदीप घुगे, डिग्रस सरपंच अशोक खेमनर, उपसरपंच रंगनाथ बिडगर, भाजप नेते दादा गुंजाळ, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच अशोक खेमनर यांनी केले, तर आभार ज्ञानदेव श्रीराम यांनी मानले.

## नगर–पुणे रेल्वेमार्ग व उड्डाणपुलांसंदर्भात

# खा.नीलेश लंके यांच्या नेतृत्वा खाली महत्त्वपूर्ण बैठक



### सातत्याने पाठपुरावा सुरूच राहील–खा.नीलेश लंके

**खा. लंके म्हणाले, "संभाजीनगर, सुपा–पारनेर आणि रांजणगाव या औद्योगिक क्षेत्रांचा वेगाने विकास होत आहे. दळणवळण सुधारण्यासाठी रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे या मागणीची तड लागेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही.**

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर–अहिल्यानगर–पुणे या प्रस्तावित रेल्वेमार्गाच्या प्रगतीसंदर्भात खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत अहिल्यानगर येथे बैठक पार पडली. यावेळी निंबळक व विळद येथील रेल्वे उड्डाणपुलांस रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिल्याची माहिती खा. लंके यांनी दिली.

खा. लंके यांनी या रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी संसदेत तसेच रेल्वे मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा केला. दिल्ली येथेही यासंदर्भात प्रयत्न सुरू असून या मार्गामुळे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

नगर–पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या नोकरदार, विद्यार्थी व व्यापाऱ्यांसाठी इंटरसिटी रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीला रेल्वे मंत्रालयाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून लवकरच या सेवेला प्रारंभ होण्याची शक्यता खा. लंके यांनी व्यक्त केली.

खा. लंके यांनी मागणी केल्यानंतर छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर या ८० किमी रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून लवकरच काम सुरू होणार आहे. या मार्गावर श्री क्षेत्र देवगड, शनिशिंगणापूर, रांजणगाव गणपतीसारखी तीर्थस्थळे तसेच वाळुंज, नगर, सुपा–पारनेर व रांजणगाव यांसारखी औद्योगिक क्षेत्रे येत असल्याने याचा मोठा फायदा होईल.

नगर तालुक्यातील विळद आणि निंबळक येथे रेल्वे उड्डाणपुलांची मागणी संसदेत लंके यांनी लावून धरली होती. या मागणीला रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंजुरी दिली असून यासंदर्भातील पत्र खा. लंके यांना प्राप्त झाले आहे. या पुलांच्या कामांना लवकरच सुरुवात करण्यावर बैठकीत चर्चा झाली.

# वाकडपाडा येथे शिवसेना चषक नाइट आर्म क्रिकेट स्पर्धा उत्साहात पार पडली



**मोखाडा । प्रतिनिधी**

क्रिकेट रसिकांसाठी वाकडपाडा येथे युवासेनेच्या वतीने भव्य नाइट आर्म क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वाढत्या उन्हामुळे दिवसा खेळण्यास होणाऱ्या अडचणींमुळे रात्रीच्या या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या स्पर्धेत मोखाडा तालुक्यासह शहापूर, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यातील संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आणि बक्षीस समारंभ शिवसेना विधानसभा संघटक प्रदीप वाघ यांच्या हस्ते पार पडला.

**स्पर्धेतील विजेते संघ**

**प्रथम क्रमांक – उधळे**
**द्वितीय क्रमांक – हट्टी पाडा**
**तृतीय क्रमांक – गोमघर**
**चतुर्थ क्रमांक – मोखाडा संघ**

यावेळी शिवसेना विभागप्रमुख निलेश झुगरे, सरपंच लता वारे, नरेंद्र येले, माजी सरपंच संजय वाघ, मंगेश दाते, पोलिस पाटील विठ्ठल गोडे, गणेश खादे, डॉ. राजेश वाघ, उपसरपंच नंदकुमार वाघ, मोहन मोडक, अनंता वारे, पत्रकार गणेश वाघ, निलेश ठोमरे, मुंबई पोलिस युवराज वाघ, गोविंद वाघ, योगेश खोरगडे, डॉ. शिवाजी घोरपडे, सखाराम शिद, माजी सरपंच मोहन गवारी, प्रितम लहामगे, नितीन पिठोले आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी वाकडपाडा गावचे शाखाप्रमुख अशोक वाघ, युवासेना पदाधिकारी संदीप वाघ, मयुर वाघ, यतिक खादे, भास्कर गांगड, क्रिकेट मंडळाचे भोलेश्वर शेजवळ, पुंडलिक शिंदे, निखिल खाडे, राज वाघ यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे स्पर्धा यशस्वीपणे पार पडली.

# शेतकऱ्यांना वेकोलीकडून नुकसान भरपाई मिळण्यासाठी शासनस्तरावर धोरण ठरवावे

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

### पिकांच्या नुकसानामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवल्याचा मुद्दा केला उपस्थित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यात वेकोलीच्या कोळसा वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना वेकोलीकडून योग्य ती नुकसान भरपाई मिळावी, यासाठी शासनस्तरावर ठोस धोरण ठरवावे, अशी मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

वणी तालुक्यातील वणी नॉर्थ आणि वणी क्षेत्र असे वेकोलीचे दोन मोठे विभाग आहेत. या विभागांमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात कोळश्याच्या धूळीचे प्रदूषण होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होते. परिणामी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानाचाही सामना त्यांना करावा लागत आहे. जिल्हा प्रशासनाने वेकोली अधिकाऱ्यांसोबत समन्वय साधून, तात्पुरत्या स्वरूपात एनडीआरएफच्या धरतीवर प्रति हेक्टरी १३५०० रुपयांची नुकसान भरपाई देण्याचा निर्णय घेतला. मात्र, भविष्यातही हा प्रश्न कायम राहणार असल्याने, वेकोली उत्पादनावर आधारित नुकसान भरपाईचे निश्चित धोरण आवश्यक आहे, याकडे आमदार मुनगंटीवार यांनी पत्रातून लक्ष वेधले आहे.



#### विभागीय आयुक्तांकडून शासनाला प्रस्ताव

**अमरावतीच्या विभागीय आयुक्तांनी १३ जानेवारी २०२४ रोजी शासनाला धोरण ठरविण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. या संदर्भात विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक लोकप्रतिनिधींची समिती गठित करून, शासनस्तरावर बैठकीचे आयोजन करण्याची गरज आहे. तसेच, शेतपीक उत्पादनाच्या प्रत्यक्ष उत्पन्नाच्या आधारभूत किमतीनुसार नुकसान भरपाईचे धोरण ठरविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशीही विनंती आ. मुनगंटीवार यांनी केली आहे.**

# पोंभुर्णा एमआयडीसी साठी संपादित शेतजमीनी साठी संबंधित शेतकऱ्यांना रु.२.२१ कोटी वितरित

## आ.मुनगंटीवार यांच्या तारांकित प्रश्नाला उद्योग मंत्री उदय सामंत यांचे उत्तर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पोंभुर्णा तालुक्यातील कोसम्बी रिठ येथील एम आय डी सी साठी संपादित शेतजमिनींचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना देण्यासाठी उच्चाधिकार समितीच्या दि. १९.१०.२०१८ रोजी संपन्न झालेल्या ९८ व्या बैठकीमध्ये रु.१०,००,०००/-प्रती हेक्टरी दरास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी मऔवि महामंडळाच्या दि.०५.०८.२०१९ च्या पत्रान्वये भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गोंडपिपरी यांना रु.०६,०७,५२,६६२/- इतकी रक्कम भूसंपादनकामी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अद्यापपर्यंत संबंधित शेतकऱ्यांना रु.२.२१ कोटीचे वाटप करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली.



कोसंबी रिठ (ता.पोंभुर्णा, जि. चंद्रपूर) येथील शेतकऱ्यांची शेतजमीन एमआयडीसीसाठी संपादीत करण्यात आली असून अद्याप उक्त जमिनीचा मोबदला संबंधितांना देण्यात आला नसल्याची बाब आ. सुधीर मुनगंटीवार यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून निदर्शनास आणली. म.ओ.वि.मं. अधिनियम १९६१. ३२ (२) अन्वये भूमीअधिग्रहण प्रकल्पबाधित भूखंड भोगवटाधारकांना दर हेक्टरी ८० लक्ष रूपये भाव देण्यात यावा किंवा उक्त भूखंड भूसंपादन प्रक्रियेमधून वगळण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केल्याचे देखील आ. मुनगंटीवार यांनी उपप्रश्नाच्या माध्यमातून निदर्शनास आणले.महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत कधी पूर्ण होणार-आ.पाटील सभागृहात आक्रमक

**परभणी । लक्ष्मण उजगरे**

डॉ.राहुल पाटील यांनी परभणीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची नवीन इमारत कधी उभारणार? असा प्रश्न विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केला. त्यासोबतच नव्या इमारती आणि शासकीय रुग्णालयासंदर्भात आग्रही मागण्या विधानसभेत लावून धरल्या. यावर निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून एक ते दीड वर्षात बांधकाम पूर्ण करू असे आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.



मुंबई येथे राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे या अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी परभणीचे आमदार डॉ.राहुल पाटील यांनी परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी बोलताना आ.पाटील म्हणाले,परभणीला वैद्यकीय महाविद्यालय मंजूर होऊन ३ वर्षे झाली; इमारतीचे बांधकामच झाले नाही.आयटीआयच्या इमारतीत वैद्यकीय महाविद्यालय भरवलं जात आहे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेची तरतूद देखील झाली. इमारतीचे बांधकाम कधी सुरू होणार? असा सवाल आ. पाटील यांनी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांना केला.शासकीय रुग्णालयाचे हस्तांतरण देखील झाले! मात्र अद्याप त्याठिकाणी सिटिस्कॅन, चठख मशीन्स उपलब्ध नाहीत. त्या कधी कार्यान्वित होतील, असा प्रश्न उपस्थित केला.

या प्रश्नाला उत्तर देताना या कामाच्या निविदा काढल्या असून लवकरच हे काम पूर्ण होईल, असे आश्वासन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिले.

# कोपरगांव औद्योगिक वसाहतीचे फिडरमधुन अन्यत्र वीज देवु नये- विवेकभैय्या कोल्हे

**प्रशांत टेके पाटील । कोपरगाव**

कोपरगांव औद्योगिक वसाहतीमधील उद्योजकांना नियीमत व पुरेशा प्रमाणांत वीज पुरवठा होत नाही म्हणून अनेक वर्षे पाठपुरावा करून नव्यांने पाच एम व्ही ए क्षमतेचे दोन वीज रोहित्र बसविण्यांत आले पण त्यातुन अन्यत्र वीजपुरवठा केला जाणार असल्याने येथील उद्योजकांचे कोटयावधीचे नुकसान होणार आहे तेंव्हा कोपरगांव औद्योगिक वसाहतीचे फिडरमधुन अन्यत्र वीज देवु नये अशी मागणी औद्योगिक वसाहतीचे चेअरमन युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी एका पत्राद्वारे केली आहे.

कोपरगाव औद्योगिक वसाहतीच्या वीजेच्या समस्येसाठी वीज वितरण कंपनीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांना पाठविलेल्या पत्रात पुढे म्हटले आहे की, सध्या वीज वितरण कंपनीने कोपरगांव औद्योगिक वसाहतीच्या फिडरमधुन कोपरगांव बस स्टँडला वीज पुरवठा करण्यासाठी वीज तारांचे काम सुरू केले आहे.कोपरगांव औद्योगिक वसाहतीच्या उद्योजकांना सतत खंडीत होणा-या वीजेच्या त्रासातुन वाचविण्यांसाठी शासनस्तरावर तसेच वीज वितरण कंपनीकडे सातत्यांने पाठपुरावा करत नव्याने ५ एमव्हीए क्षमतेचे दोन नविन वीज रोहित्र कोपरगांव औद्योगिक वसाहतीत सुरू करण्यांत आले त्यामुळे येथील उद्योजकांचे नुकसान टळले आहे.

औद्योगिक वसाहतीत अलिकडे नव्याने काही उद्योग सुरू झाले आहेत. त्यांना यातून वीजपुरवठा होण्यासाठी वीज वितरण कंपनीने कोपरगांव बस स्टँडला वीजपुरवठा करण्यासाठी नव्याने वीज लाईन टाकण्याचे काम हाती घेतले आहे ते उद्योजकांवर अन्याय ठरणार आहे. असे झाल्यास येथील औद्योगिक उत्पादनात घट होवुन त्याचा फटका व्यावसायिकांना बसणार आहे तेंव्हा वीज वितरण कंपनीने सद्गुरू गंगागिर महाराज महाविद्यालयासमोरील १३२ केव्ही वीज सबस्टेशनमधुन कोपरगांव बस स्टँडला वीज द्यावी म्हणजे कोपरगांव औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांवर ओढवणारे वीजेचे संकट दूर होईल असे त्यांनी शेवटी म्हटले आहे.



वीज खंडित झाल्यानंतर उद्योजकांना होणारे नुकसान हे दुर्देवी असते. अन्यत्र वीजपुरवठा झाल्याने अनेकदा तुटवडा होऊन उद्योग अडचणी येण्याची स्थिती असते. या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून समस्यांचे तातडीने निवारण करण्यासाठी कार्यवाही होण्याची अपेक्षा उद्योजकांनी व्यक्त केली आहे.

## सिंदी रेल्वेला अप्पर तालुका घोषित करा

# आ.समीर कुणावार यांची महसूल मंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांच्याकडे मागणी

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

हिंगणघाट मतदार संघातील सिंदी (रेल्वे) शहर हे क वर्ग नगरपरिषद क्षेत्र असुन अजुनही तालुक्याचा दर्जा मिळालेला नाही. परिसरातील गावे व त्यांची लोकसंख्या लक्षात घेता सिंदी (रेल्वे) ला तालुक्याचा दर्जा देणे अत्यंत गरजेचे असून परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. त्यांना छोटया-मोठ्या तहसिलच्या कामाकरिता शहरातील व परिसरातील गावातील नागरीकांना सेलू येथे ४० कि.मी. पायपीट करावी लागते. या ठिकाणी मागील अनेक वर्षापासुन शहराला तालुक्याचा दर्जा देण्यासाठी मागणी असुन सन २००८ व २०१५ मध्ये शासनाकडे याबाबतचा प्रस्ताव गेलेला होता. मात्र त्यावर निर्णय होऊ शकलेला नाही आता शासनाने नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात नवनिर्मित अप्पर तालुका (तहसिल) निर्माण करत असल्याची घोषणा केल्यामुळे सिंदी रेल्वे येथील नागरीकांची अपेक्षा वाढलेली आहे व त्यांची मागणी रास्त सुध्दा आहे




अश्या आशयाचे पत्र आमदार समीर कुणावार यांनी महसूल मंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांच्याकडे दिले असून त्यात प्रामुख्याने शासनाच्या नवनिर्मित तालुक्याच्या धोरणाला अनुसरुन हिंगणघाट मतदार संघातील सिंदी (रेल्वे) शहराला अप्पर तहसिल दर्जा मिळण्याबातच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी अशी मागणी केली आहे त्यांच्या सातत्यपूर्ण मागणी लक्षात घेत महसूल मंत्री बावनकुळे यांनी संबंधितांना याबाबत सुचित केले असून लवकरच सिंदी रेल्वेला अप्पर तहसीलचा दर्जा मिळण्याचे संकेत आहेत.

# ऑटोरिक्षा-टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या शासन निर्णयात सुधारणा करा

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे मुख्यमंत्री आणि परिवहन मंत्री यांना पत्र

### ऑटोरिक्षा-टॅक्सी चालक-मालकांची आर्थिक स्थिती ध्यानात घेण्याकडे वेधले लक्ष

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी चालक-मालकांच्या हितासाठी स्थापन करण्यात आलेल्या कल्याणकारी मंडळाच्या कामकाजाची नियमावली गृह विभागाने २४ जुलै २०२४ रोजी निश्चित केली. मात्र, या चालक-मालकांची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन शासन निर्णयात सुधारणा करावी, अशी मागणी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पत्राद्वारे केली आहे.यामध्ये नोंदणी शुल्क व ओळखपत्र शुल्क ५०० ऐवजी २०० रुपये आणि वार्षिक सभासद शुल्क ३०० ऐवजी १०० रुपये करण्यात यावे. गृह विभागाने १ ऑगस्ट २०२४ रोजी जारी केलेल्या शुद्धिपत्रकानुसार, कल्याणकारी मंडळात अशासकीय सदस्यांची संख्या २ दर्शवण्यात आली आहे. मात्र, ही संख्या वाढवावी आणि १० संघटनात्मक प्रतिनिधी समाविष्ट करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, जिल्हास्तरीय कल्याणकारी मंडळात संघटनेच्या ३ प्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक-मालक असोसिएशनच्या संस्थापक अध्यक्षांनी केलेल्या मागणीप्रमाणे, रिक्षा चालकांना सन्मान निधी न देता १० हजार रुपये निवृत्ती वेतन द्यावे आणि ६० वर्षे पूर्ण झाल्यावर निवृत्ती वेतन लागू करावे अशी विनंती करण्यात आली आहे. यासोबतच, कल्याणकारी मंडळाच्या कामकाजासाठी शासनाने दरवर्षी ५० कोटींचा निधी उपलब्ध करून द्यावा अशीही प्रमुख मागणी महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक-मालक असोसिएशनच्या संस्थापक अध्यक्षांनी आ. मुनगंटीवार यांच्याकडे केली होती. त्याची दखल घेऊन आ. मुनगंटीवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि परिवहन मंत्री यांना पत्र दिले आहे. राज्यातील हजारो ऑटो आणि टॅक्सी चालकांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेसाठी हे कल्याणकारी मंडळ महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे त्यांच्या हिताच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री आणि परिवहन मंत्री यांना दिलेल्या पत्रातून केली आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .